# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जुलै २०१८

## L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | L.T. मार्ग पो. ठाणे गुरक्र.२०४/२०१८ कलम ४५४,४५७,३८० भादवि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २१/०७/२०१८ रोजी २२.१५ वा. ते २३/०७/२०१८ रोजी ११.१५ चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | झायमा बिल्डींग, ०४ था माळा, अब्दुल रेहमान स्ट्रिट, २६/ब, बि.क्र.२७२, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री. जावेद इनबीशाद सय्यद वय ३१ वर्षे. |
| ५ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | १) रोख रक्कम रू.५५,००,०००/-,<br>२) सी.सी.टि.व्ही.फुटेजचा डि.व्ही.आर किं. अं.रू.८,०००/-<br>असे एकुण रू.५५,०८,०००/-ची मालमत्ता |
| ६ | **हस्तगत मालमत्ता** | रोख रक्कम रू. ५५,६२,३००/- |
| ७ | **आरोपी अटक** | जावेद इनबीशाद सय्यद वय ३५ वर्षे ( **फिर्यादी स्वत:** )<br>**अटक दिनांक २५/०७/२०१८ रोजी** |

L.T. मार्ग पो. ठाणे गुरक्र.२०४/२०१८ कलम ४५४,४५७,३८० भादवि. या गुन्हयात दिनांक २१/०७/२०१८ रोजी २२.१५ वा. ते २३/०७/२०१८ रोजी ११.१५ चे दरम्यान झायमा बिल्डींग, ०४ था माळा, अब्दुल रेहमान स्ट्रिट, २६/ब, बि.क्र.२७२, मुंबई ०३ याठिकाणी फिर्यादी नोकरी करत असलेल्या होलसेल व रिटेल बॉल पेन विक्रीच्या कार्यालयाच्या दरवाजाचा कडीचा कोयंडा तोडून त्यांचे कार्यालयातील माळयावर ठेवलेली रोख रक्कम रू.५५,००,०००/-असलेली बॅग व कार्यालयातील सी.सी.टि.व्ही.फुटेजचा डि.व्ही.आर किं. अं.रू.८,०००/- असे एकुण रू.५५,०८,०००/-ची मालमत्ता फिर्यादींचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने घरफोडी चोरी केली फिर्यादी यांनी तक्रार दिलेवरून दिनांक २३/०७/२०१८ रोजी सदर अज्ञात इसमाविरूध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

L.T. मार्ग पोलीस ठाणेच्या पथकाने गुन्हयाची माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी भेट देवून तपासास सुरूवात केली. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने सदर पथकाने फिर्यादी यांची प्रत्यक्ष भेट घेवून गुन्हयाचा संपुर्ण घटनाक्रम समजुन घेतला.

सदर पथकाने घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले असता, घटनास्थळ हे होलसेल व रिटेल बॉल पेन विक्रीच्या कार्यालय आहे. सदर कार्यालयाचे चोरटया इसमाने दरवाजाचा कडीचा कोयंडा तोडून आत प्रवेश करून नमुद तक्रारीप्रमाणे रोख रक्कमरू.५५,००,०००/-ची बॅग चोरून नेली तसेच सदर पथकाचे असेही निदर्शनास आले की, नमुद अज्ञात चोरटयाने त्यांचे कार्यालयातील सी.सी.टि.व्ही.फुटेजचा डि.व्ही.आर किं.अं.रू.८,०००/- देखील चोरून नेलेला आहे. घटनास्थळाचे परिसरात मोठया प्रमाणावर घाऊक माल विकणारे व्यापारी यांची कार्यालये असल्याने सदर पथकाने व्यापाऱ्यांना विश्वासात घेवुन तपास करण्यास सुरूवात केली. या करीता वरिष्ठांचे परवानगीने विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

सदर पथकांने प्रथमत: अभिलेखावरील गुन्हेगार यांची तपसणी करण्यास सुरूवात केली. त्यानंतर गुन्हयांच्या अनुषंगाने चौकशी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) गुन्हा घडल्याचे कालावधीमध्ये रविवार असल्याने बाजारपेठ बंद होती. तसेच परिसरातील लाईट देखील रात्रौ च्या वेळी बंद होत्या. २) फक्त दुसऱ्या मजल्यावरील १ CCTV चालु होता. त्याचे ३६ तासाचे CCTV फुटेजची तपासणी करण्यात आली असता, फिर्यादी (मॅनेजर) हा घटनेच्या कालावधीत २ वेळा वर, खाली गेल्याचे व कोणीतरी संशयीत इसम रेनकोटने चेहरा झाकुन घेतल्याचे दिसुन आले. परंतु रात्र व लाईट गेलेल्या असल्याने फुटेजमधिल व्यक्ती अस्पष्ट दिसुन आली. तसेच सदरहु CCTV चालु आहे हे जाणणाऱ्या व्यक्तीनेच हे कृत्य

केले असावे असा संशय सदर पथकास आला. परंतु फिर्यादी हा त्या परिसरामध्ये रहात असल्याने त्याच्यावर संशय घेणे उचित होणार नाही याची जाणीव मनात ठेवून सदर पथकाने घटनास्थळी पुनः पुन्हा ५ वेळा तपासणी करून परिस्थितीची पाहणी केली. तसेच फिर्यादींच्या स्कुटरचीही तपासणी केली असता, स्कुटरच्या त्याच्या डिकीमध्ये एक रेनकोट मिळुन आला.

सदर पथकाने फिर्यादी (मॅनेजर) नामे जावेद इनबीशाद सय्यद. वय ३५ वर्षे याचेबाबत संपूर्ण माहिती प्राप्त करता, नमुद फिर्यादी (मॅनेजर) हा दुकान मालकांकडे खुप वर्षापासून काम करून त्यांचेकडेच राहतही होता. त्यामुळे मालक व नोकर यांचेमध्ये अत्यंत जिव्हाळयाचे संबध बनलेले होते. सदर पथकाने फिर्यादीवर संशय घेतला परंतु, आरोपी असे कृत्य करणार नाही या मताशी मालक ठाम होते व ते फिर्यादीकडे चौकशी करण्यास पथकाला मज्जाव करीत होते आणि त्याचे फिर्यादींना पुर्णतः समर्थन होते. त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा संशय नसल्याचे मालक वारंवार सांगत होते. तरीही सदर पथकाने नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने योग्यवेळी निर्णय घेवुंन फिर्यादी मॅनेजरला अटक चौकशीकामी ताब्यात घेतले. जो पर्यत कंपनीच्या मालकाचे फिर्यादीस समर्थन आहे तो पर्यत तो गुन्हयांची कबुली देणार नाही असे समजुन आल्याने सदर पथकाने त्यांनी आरोपीचे समर्थन करू नये असे कंपनीच्या मालकांना विश्वासात घेवुन सविस्तर समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर फिर्यादीस मालकांचे कोणत्याही प्रकारचे समर्थन नाही ही बाब फिर्यादीं म्हणजेच अटक आरोपीच्या निदर्शनास आणुन देवुन त्यांच्याकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने कसुन चौकशी करण्यात आली.

सदर पथकाने फिर्यादीचे मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व टॉवर लोकेशन प्राप्त केले. सदर पथकाने प्राप्त सीडीआर व टॉवर लोकेशनचा अभ्यास करून तसेच ताब्यातील फिर्यादीचे विरोधात असलेले पुरावे व त्याने पथकास दिलेल्या उत्तराशी विसंगत परिस्थीती त्याला दाखविण्यात आली. तसेच सदर पथकाने ताब्यातील फिर्यादी/आरोपीकडे सातत्यपुर्ण कसुन सखोल चौकशी करता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची स्पष्ट कबुली. आरोपीत नामे जावेद इनबीशाद सय्यद. वय ३५ वर्षे याचा सदर गुन्हयातील सक्रीय सहभाग निष्पन्न झालेवरून सदर पथकाने त्यास दिनांक २५/०७/२०१८ रोजी नमुद गुन्हयात रितसर अटक केली. सदर पथकाने अटके दरम्यान आरोपीताकडे कसुन चौकशी करून गुन्हयातील चोरीस गेलेली संपुर्ण ५५,६२,३००/— रूपये त्यांचे राहत्या घराच्या फ्लश टॅक मधुन सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत केले.

L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई च्या पथकाने अत्यंत चौकसबुध्दीने व तांत्रिक तपासाद्वारे नमुद गुन्हा हा फिर्यादी यानेच त्याची तल्लख बुध्दी चातुर्याने केल्याची कौशल्यपुर्ण उकल करून, त्याचेकडे सातत्यपुर्ण चौकशी करून सदरचा गुन्हा करणाऱ्या फिर्यादीसच शिताफीने अटक करून गुन्हयातील १०० टक्के मालमत्ता हस्तगत करून सदरचा चोरीचा गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना जुलै—२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई .तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | वपोनि संतोष आत्माराम राऊत | ०७ | पो.ह.क्र.२५१५९/भालचंद्र दिनकर घाडीगांवकर |
| ०२ | पोलीस निरीक्षक संजय राजाराम मोहिते | ०८ | पो.ह.क्र.२९७८६/आनंद बन्सीधर पांडे |
| ०३ | सपोनि. प्रदिप मोहन पगारे. | ०९ | पो.शि.क्र.०७.१४६३/किरण सुखलाल महाजन |
| ०४ | सपोनि. गणेश जानकीराव दळवी | १० | पो.शि.क्र.०८.६८४/किरण अरूण गुजर |
| ०५ | पो.उ.निरी. एकनाथ विश्वनाथ देसाई. | ११ | पो.शि.क्र.९७०७६६/प्रशांत गणपत चव्हाण |
| ०६ | पो.उ.निरी. हनमंत श्रीमंत कुंभारे | —— | —— |

--- ००० ---